| | | | |
|---|---|---|---|
| MHYA050059652023 | दाखल दिनांक | : | ०१/११/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | ०१/११/२०२३ |
| | निकाल दिनांक | : | २३/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०२व.०४म.२२दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक—२)**
**पुसद यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती व्ही.डी.बिरहारी)**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक—७६/२०२३** **निशाणी क्रमांक—२२**
CNR:MHYA050059652023

**कु. ओवी राजकुमार सावरकर,**
अ.पा.क.आई
राजश्री राजकुमार सावरकर,
वय—३७ वर्षे, धंदा— घरकाम,
रा. व्यंकटेश कॉलनी बटाकी नाका एस.आर.पी.कॅम्प अमरावती,
ता.जि.अमरावती
ह.मु. व्दारा— श्रीरंग तुकाराम काळे यांचे घरी,
सुभाषवार्ड काटकर मंडपजवळ,
पुसद ता.पुसद जि.यवतमाळ. **आवेदीका**

**विरुद्ध**

**राजकुमार उत्तमराव सावरकर,**
वय—५६ वर्ष, धंदा—नोकरी,
रा. व्यंकटेश कॉलनी बटाकी नाका एस.आर.पी.कॅम्प
अमरावती, ता. जि. अमरावती
**..अनावेदक..**

प्रकरण : फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ नुसार पोटगी मिळण्याकरिता अर्ज.

..........................................................................................

ॲड. श्रीमती अंबिका जाधव : आवेदीकातर्फे
एकतर्फा : अनावेदक

..........................................................................................

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक १७/०३/२०२६)

१. आवेदिकेने तिच्या आईमार्फत सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ नुसार अनावेदकाकडुन दरमहा प्रत्येकी रुपये १५,०००/— पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**आवेदिकेचे थोडक्यात तथ्यकथन खालील प्रमाणे आहे.**

२. आवेदीकेचे वय अर्ज दाखल करताना ३ वर्षे असल्याने आवेदिकेतर्फे अज्ञान पालककर्ता म्हणून आवेदिकेच्या आईने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. आवेदीकेची आई व अनावेदक यांचा विवाह दिनांक ०४.०१.२०१५ रोजी अमरावती येथे रितीरिवाजानुसार संपन्न झाला. अनावेदक यांचा हा दुसरा विवाह असून अनावेदकाची पहिली पत्नी नामे संगिता राजकुमार सावरकर हिचा सन २०१० मध्ये मृत्यु झाला होता. अनावेदकाला त्याच्या पहिल्या पत्नीपासून तीन अपत्ये नामे कु. मेघा राजकुमार सावरकर, गौरव राजकुमार सावरकर व पुजा राजकुमार सावरकर तसेच अनावेदकाची दुसरी पत्नी म्हणजे आवेदीकेची आई यांचेकडून प्रस्तुत आवेदिका कु.ओवी राजकुमार सावरकर ही मुलगी आहे.

३. लग्नानंतर आवेदिका क्रमांक—१ ची आई अनावेदकासोबत अमरावती येथे राहण्यासाठी गेली. तेथे अनावेदकाच्या पहिल्या पत्नीचे मिळकत म्हणजे घरात आवेदिकेचे आई, अनावेदक, अनावेदकाचे पहिल्या पत्नीपासून असलेले तिनही मुले व अनावेदकाच्या पहिल्या पत्नीची आई हे सोबत राहत होते. तेव्हा अनावेदकाने आवेदिका हिच्या आईस दिड ते दोन महिने चांगले नांदविले. अनावेदकाच्या पहिल्या पत्नीची आई नामे श्रीमती सुमनबाई साहेबराव धर्माळे यांचा सुरुवातीपासून आवेदिकेच्या आईच्या व

अनावेदक यांच्या विवाहास विरोध होता. अनावेदकाच्या पहिल्या पत्नीच्या आईचे सदैव अनावेदकाच्या दुस—या विवाहाबाबत विरोध करुन आवेदिकेच्या आईस कुठलेही कारण नसताना शारिरीक व मानसिक त्रास देत असे.

४. अनावेदक हा पोलीस खात्यात नोकरीला असून तो आजरोजी अमरावती ग्रामीण येथे हेड कॉन्स्टेबल पदावर अधिकारी म्हणून कार्यरत आहे. अनावेदकाने आवेदिकेच्या आईला ५ लाख रुपयाची मागणी करुन मारहाण व शिवीगाळ केल्याबाबत तसेच आवेदिकेची आईस शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास दिल्याबाबत तिने अनावेदकाविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ४९८—अ अंतर्गत पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती येथे रिपोर्ट नोंदविण्यात आला असून सदरचा गुन्हा अप.क्र.४८४/२०१७, दिनांक १७.०३.२०१७ रोजी अनावेदकाविरुद्ध नोंदविण्यात आला व सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. यापूर्वी देखील आवेदिकेच्या आईने दिनांक ०४.०२.२०१६ रोजी अनावेदकाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा ३२/२०१६ नोंद केला होता. परंतू, अनावेदक हा पोलिस खात्यात कार्यरत असल्यामुळे त्यांनी त्यांच्या पदाचा व संबंधाचा दुरूपयोग करून या प्रकरणात कार्यवाही होवू दिली नाही.

५. त्याशिवाय अनावेदकाने आवेदिकेच्या आईविरुद्ध अमरावती येथील कौटुंबिक न्यायालयात एच. एम. पी नंबर. ए/२१४/२०१६ हे दाखल केले होते. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असताना अनावेदकाने आवेदिकेच्याच्या आईविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ रुल १ व २ नुसार मनाई हुकूम मिळण्याकरिता तिला घरात प्रवेश नाकारण्याकरिता अर्ज केला होता. परंतु तो अर्ज विद्यमान न्यायालयाने नाकारला होता. आवेदिकेच्या आईला वास्तव्याकरिता अमरावती येथे दुसरी कुठलीही जागा उपलब्ध नसल्याने तिला होत असलेला सर्व त्रास सहन करुन ती अनावेदकासोबतच अमरावती येथे राहावे लागत होते. त्यानंतर दिनांक १९.०५.२०१९ रोजी वर

नमुद अर्ज नाकारल्यानंतर आवेदिकेची आई व अनावेदक यांची कौटुंबिक न्यायालय, अमरावती येथे तडजोड झाली होती. त्यानुसार अनावेदकाने आवेदिकेची आई त्याचे घरात ज्या खोलीत राहत होती ती खोली तिला राहण्याकरीता व तिच्या दैनंदिन गरजांची पुर्तता करण्याकरीता आश्वासित केले होते. त्यादरम्यान अनावेदकाने आवेदिकेच्या आईसोबत प्रकरणात तडजोड करून तिचेसोबत संसार करण्याची ईच्छा प्रकट केली व भविष्यात पत्नी म्हणून राहणार असल्याचे भासवून त्यांच्या विवाहसंबंधाचा गैरफायदा घेवून तिच्याशी शारिरिक संबंध प्रस्थापीत केले त्यामुळे आवेदिकेची आई गरोदर राहिली. त्यानंतर सन २०१९ दरम्यान अनावेदकाने आवेदिकेच्या आईला ती गरोदर असताना बेदम मारहाण करून घराबाहेर हाकलून दिले. त्यामुळे ती नाईलाजास्तव पुसद येथील तिच्या वडीलांच्या घरी वास्तव्यास आली व दिनांक २८.०३.२०२० रोजी तिने आवेदीका ओवी हिला जन्म दिला.

६. आवेदिकेचा जन्म झाल्याबाबत अनावेदकास कळून देखील ते आवेदिकेस बघण्याकरीता आले नाही किंवा विचारपुसदेखील केली नाही. कोरोना रोगामुळे असलेल्या ताळेबंदाच्या आदेशामुळे आवेदिकेची आईदेखील अमरावती येथे जाण्यास असमर्थ होती. तसेच तिच्या पायाला दुखापत होवून पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे ती जाणेयेणे करण्यास असमर्थ होती.

७. आवेदिकेच्या आईने आवेदिकेच्या जन्मापुर्वी अनावेदकाविरूध्द पुसद येथील न्यायालयात पोटगीची रक्कम मिळण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ अंतर्गत फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३९/२०१८ दाखल केला होता. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना आवेदिकेचा जन्म झाल्यानंतर तिला पोटगी मिळण्याकरीता आवश्यक पक्षकार म्हणून दुरूस्ती करण्याचा अर्ज आवेदिकेच्या आईने दाखल केला होता परंतू सदर अर्ज नामंजुर झाला होता. प्रस्तुत आवेदिका तिच्या आईसोबत नाईलाजाने पुसद येथे

राहत आहे. आवेदिकेच्या आईकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने ते पुर्णत: तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. अनावेदक हे आवेदिकेचे जन्मदाते वडील असून त्यांचेवर आवेदिकेच्या पालनपोषणाची व अन्नवस्त्राची कायदेशिर जबाबदारी आहे. आवेदिकेच्या सर्वांगिण विकासाकरीता तिला चांगल्या पध्दतीचे राहणीमान, औषधोपचार व अन्नपाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. आवेदिकेच्या आईस न्यायालयाने मंजुर केलेली खावटीची रक्कम ही अल्प असून वाढत्या खर्चामुळे व महागाईमुळे दोघांचे पालणपोषण करण्यास पुरेशी नाही. आवेदिकेला शालेय प्रवेश व शिक्षणासाठीदेखील पैश्याची आवश्यकता असणार आहे. अनावेदकाने फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३९/२०१८ मध्ये दाखल केलेल्या उत्तरात आवेदिका ही त्याची मुलगी असल्याचे नाकारले होते.

८. अनावेदक हे पोलीस खात्यात चांगल्या पदावर नोकरीस असून त्यांना घरभाडे व शेतातूनदेखील उत्पन्न प्राप्त होते. त्यांना दरमहा ८०,०००/— रूपये पगार असून ते प्रतिमहा १५,०००/— रूपये आवेदिकेस पोटगी देण्यास समर्थ आहे व अनावेदकाची ती नैतिक जबाबदारी आहे. त्यामूळे आवेदिकेच्या आईने आवेदिकेला दरमहा १५,०००/—रुपये पोटगी अनावेदकाकडून मिळण्याकरिता विनंती केली.

९. न्यायालय नोटीस मिळून देखील अनावेदक प्रस्तुत प्रकरणात हजर न राहील्याने त्यांच्या गैरहजेरी प्रस्तुत प्रकरण चालविण्यात आले.

१०. अर्ज, विधिज्ञांचा युक्तीवाद व न्यायालयापुढे असलेल्या दस्तऐवजांवरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेनुसार देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आवेदिका असे सिद्ध करते काय की, अनावेदकाने तिच्या पालनपोषणाकडे दुर्लक्ष केले किंवा त्याकरीता नकार दिला? | **व्होय.** |
| २. | आवेदिका असे सिद्ध करते काय की, ती स्वत :च्या उदरनिर्वाहाकरीता असमर्थ आहे? | **होय.** |
| ३. | आवेदिका असे सिद्ध करते काय की, अनावेदकाकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे? | **होय.** |
| ४. | आवेदिका पोटगी मिळण्यास पात्र आहे काय असल्यास किती? | **आवेदिकेला दरमहा ३,०००/— रुपये** |
| ५. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

११. आवेदिकाने तिच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ आवेदिकेची आई राजश्री यांना साक्षीदार क्रमांक १ म्हणून तपासले आहे. आवेदिकेचे आधारकार्ड निशाणी क्रमांक १७ व जन्म प्रमाणपत्र निशाणी क्रमांक १८ तसेच अनावेदकाचे एप्रिल—२०१७ व मे—२०१७ च्या पगारपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्रमांक १९ व निशाणी क्रमांक २० वर दाखल केलेले आहेत. आवेदिकेने निशाणी क्रमांक २१ वर पुरसिस दाखल करून तिचा पुरावा बंद केलेला आहे. याउलट अनावेदकाने कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा दाखल केला नाही.

**मुद्दा क्रमांक १ बाबत—**

१२. आवेदिकेच्या आईने निशाणी क्रमांक—११ अन्वये पुराव्याच्या शपथपत्राद्वारे पुरावा दिला की, अनावेदकाची पहीली पत्नी नामे संगिता राजकुमार सावरकर हिचा सन २०१० मध्ये मृत्यू झाला होता व तिचे पासून अनावेदकाला मेघा राजकुमार सावरकर, गौरव राजकुमार सावरकर व पुजा राजकुमार सावरकर असे अपत्य आहेत. दिनांक ०४.०१.२०१५ रोजी आवेदिकेची आई नामे राजश्री यांचा अनावेदकासोबत विवाह झाला. त्यानंतर

आवेदिकेची आई अनावेदकासोबत अमरावती येथे नांदण्याकरीता गेली तेव्हा अनावेदकासोबत त्यांचे पहिल्या पत्नीपासून असलेले तिन अपत्ये व पहिल्या पत्नीची आई नामे सुमनबाई साहेबराव धर्माळे हेदेखील सोबत राहत होते. अनावेदकाच्या पहिल्या पत्नीची आई यांचा अनावेदकाच्या दुस—या विवाहास विरोध असल्याने त्या आवेदिकेच्या आईला विनाकारण त्रास देत असे.

१३. आवेदिकेतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, अनावेदकाने आवेदिकेच्या आईला पाच लाख रूपयाची मागणी करून तिला मारहाण व शिवीगाळ केल्याबाबत आवेदिकेच्या आईने भारतीय दंड विधानचे कलम ४९८ अ अंतर्गत दिनांक १७.०३.२०१७ रोजी गुन्हा क्रमांक ४८४/२०१७ नोंदविला तसेच दिनांक ०४.०२.२०१६ रोजी अदखलपात्र गुन्हा क्रमांक ३२/२०१६ देखील नोंदविला होता. अनावेदकाने आवेदिकेच्या आईविरूध्द अमरावती येथील कौटुंबिक न्यायालयात एच.एम.पी. क्रमांक ए—२१४/२०१६ दाखल केले होते. दिनांक १९.०५.२०१९ रोजी आवेदिकेची आई व अनावेदक कौटुंबिक न्यायालय अमरावती येथे तडजोड झाली होती व त्यानुसार आवेदिकेची आई अनावेदकाच्या घरात ज्या खोलीत राहत होती ती खोली राहण्याकरीता व आवेदिकेच्या आईच्या दैनंदिन गरजांची पुर्तता करण्याकरीता आश्वासित केले होते. त्या काळात अनावेदकाने आवेदिकेच्या आईसोबत संसार करण्याची इच्छा प्रकट करून आवेदिकेच्या आईसोबत शारीरीक संबंध प्रस्थापित केले व त्याव्दारे आवेदिकेची आई गरोदर राहीली. परंतू सन २०१९ मध्ये आवेदिकेची आई गरोदर असताना अनाावेदकाने तिला मारहाण करून घराबाहेर हाकलून दिले. तेव्हापासून आवेदिकेची आई नाईलाजाने पुसद येथे माहेरी राहत आहे.

१४. आवेदिकेतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, आवेदिकेचा जन्म दिनांक २८.०३.२०२० रोजी झाल्याचे

कळवूनदेखील अनावेदक आवेदिकेस बघण्यास आले नाही किंवा विचारपुसदेखील केली नाही. कोरोना महामारीच्या ताळेबंदेच्या आदेशामुळे व झालेल्या दुखापतीमुळे आवेदिकेची आईदेखील अमरावती येथे जाण्यास असमर्थ होती. त्यादरम्यान आवेदिकेच्या आईने फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३९/२०१८ मध्ये पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेला अर्ज प्रलंबित होता व आवेदेकीलादेखील आवश्यक पक्ष म्हणून जोडण्याकरीता अर्ज केला होता परंतू सदर अर्ज नामंजुर झाला होता.

१५. आवेदिकेच्या आईने शपथपत्रावर कथन केले आहे की, आवेदिका तिच्या आईसोबत राहत असून तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अनावेदक हे आवेदिकेचे जन्मदाते वडील असल्याने तिचे पालनपोषण व अन्नवस्त्राची जबाबदारी अनावेदकावर आहे. आवेदिकेच्या मानसिक व शारीरीक विकासाकरीता तिला चांगल्यापध्दतीचे राहणीमान, औषधोपचार, शिक्षण व अन्नपाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. आवेदिकेच्या आईला मिळत असलेल्या पोटगीच्या रक्कमेत दोघींचे पालणपोषण होणे शक्य नाही. याउलट अनावेदक पोलिस खात्यात चांगलया पदावर नोकरीस असून त्यांना प्रतिमहा ८०,०००/— रूपये पगार, तसेच घरभाडे व शेतीचे उत्पन्न मिळते. त्यामुळे ते आवेदिकेला प्रतिमहा १५,०००/— पोटगी रक्कम देण्यास समर्थ आहे.

१६. अनावेदकाविरूध्द प्रकरण एकतर्फा चालल्यामुळे आवेदिकेची आईच्या म्हणजे साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्याला आव्हान देण्यात आले नाही. त्यामुळे त्यांच्या पुराव्याचे कुठेही खंडन झाले नाही. आवेदिकेच्या आईच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आवेदिकेच्या आईने केलेल्या अर्जावरून अनावेदक यांनी आवेदिकेच्या आईला दरमहा पोटगी रक्कम देण्याकरीता आदेशित केले आहे. आवेदिकेचे आधारकार्ड

निशाणी क्रमांक १७ व जन्म प्रमाणपत्र निशाणी क्रमांक १८ चे अवलोकन केले असता दिसून येते की, आवेदिकेचा जन्म दिनांक २८.०३.२०२० रोजी पुसद येथे झालेला आहे. अनावेदकाचे नाव वडिलांच्या नावाचे जागी लिहिलेले आहे. यावरून स्पष्ट होते की, आवेदिकेची आई व अनावेदक यांच्या विवाहसंबंधातून आवेदिकेचा जन्म झाल्याने आवेदिकेची पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारीदेखील अनावेदकावर आहे. परंतू, आवेदिकेच्या जन्मानंतरदेखील अनावेदकाने आवेदिकेच्या पालनपोषनाकडे दुर्लक्ष केले. त्यामूळे मी निष्कर्ष नोंदवते की, अनावेदकाने आवेदिकेच्या पालनपोषणाकडे दुर्लक्ष केले. त्याप्रमाणे मी मुद्दा क्रमांक—१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक— २ व ३ बाबत—</u>**

१७. आवेदिकेतर्फे साक्षीदार क्र. १ यांनी पुराव्याच्या शपथपत्राद्वारे नमुद केले आहे की, अनावेदकाने आवेदिकेच्या आईचा मानसिक व शारिरीक छळ केलयामुळे व तिला घराबाहेर काढून दिल्याने तिने अनावेदकाकडून पोटगी मिळण्याकरीता अर्ज क्रमांक ३९/२०१८ दाखल केला होता व त्यानुसार तिला खावटीची रक्कम मिळण्याकरीता न्यायालयाने आदेश दिले होते. परंतू, ती रक्कम आवेदिका व आवेदिकेच्या आईच्या उदरनिर्वाहाकरीता पुरेशी नाही. तसेच, आवेदिका केवळ पाच वर्षाची असल्याने ती उदरनिर्वाहाकरीता अनावेदकावर निर्भर आहे. तसेच, तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार आवेदिकाकडे उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध असलयाची बाब दाखविण्याची जबाबदारी अनावेदकावर आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आवेदिकेला उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसल्याच्या पुराव्याला अनावेदकातर्फे आव्हान देण्यात आले नाही. त्यामुळे आवेदिका स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे.

१८. पुढे आवेदिकातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमूद केले आहे की, अनावेदक हे पोलिस खात्यात चांगल्या

पदावर नोकरी करीत असुन त्यांना घरभाडे व शेतीतूनदेखील उत्पन्न प्राप्त होते. अनावेदकास नोकरीतून दरमहा ८०,०००/— रुपये पगार मिळतो. आवेदिकेने तिच्या कथनाच्या पृष्ठर्थ अनावेदकाचे एप्रिल—२०१७ व मे—२०१७ या महिन्याचे पगारपत्रकाच्या प्रमाणित प्रत निशाणी क्रमांक १९ व निशाणी क्रमांक २० वर दाखल केले आहे. सदर पगारपत्रक हे फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ३९/२०१८ या प्रकरणात निशाणी क्रमांक ५६ व निशाणी क्रमांक ५७ वर दाखल केलेल्या पगारपत्रकाच्या नकला आहेत. निशाणी क्रमांक २० चे अवलोकन केले असता मे—२०१७ च्या पगारपत्रकानुसार अनावेदकास ४९०००/— रूपये पगार आहे व त्यातून २४४००/— रूपये कपात होत असून त्यांच्या हातात १६९८५/— रूपये पगार येतो. परंतू, अनावेदक शासकिय कर्मचारी असल्याने दरवर्षी इतर शासकिय कर्मचा—यांप्रमाणे त्यांचा पगारात देखील वार्षिक वाढ होवून सन २०१७ पासून सन २०२६ पर्यंत अनावेदकाचा पगार निश्चितच वाढलेला असेल व त्यामुळे अनावेदक यांच्या हातात दरमहा साधारणत: २५०००/— रूपये पगार येत असावा असे मी गृहीत धरते.

१९. अनावेदकास प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळूनदेखील ते या प्रकरणात हजर झाले नाही व उत्पन्नाबाबत देखील त्यांनी कोणताही पुरावा दिला नाही. आवेदिकेतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांनी मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक १० वर दाखल केलेले आहे. यामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, आवेदिकेकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही व आवेदिकेच्या आईला अनावेदकाकडून दरमहा ६०००/— रूपये पोटगीची रक्कम मिळते. परंतू, ती रक्कम आवेदीका व तिची आई यांचा उदरनिर्वाह होण्यास पुरेशी नाही. याउलट अनावेदक यांना दरमहा साधारणत: २५,०००/—रुपये पगार दरमहा हातात येत असावेत म्हणून त्यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असल्याचा निष्कर्ष नोंदवते. त्याप्रमाणे ***मुद्दा क्रमांक—२ व ३*** चे उत्तर मी

होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक—४ व ५ बाबत—</u>**

२०. मी मुद्दा क्रमांक—१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवल्याने आवेदिका पोटगी मिळण्यास पात्र ठरते. आवेदिकेने दरमहा १५०००/— रूपये पोटगीची मागणी केली आहे. आवेदिकेनी सदर पोटगी तिच्या अन्न, वस्त्र, शिक्षण, पालनपोषण व औषधोपचाराकरीता मागीतली आहे. आवेदिका हे मध्यम कुटूंबाचे सदस्य असल्याचे दिसुन येते. आवेदिकेच्या राहणीमानानुसार त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेवुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून मी या निष्कर्षास येत आहे की, आवेदिकेला दरमहा ३०००/— रुपये ऐवढी रक्कम तिच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरीता पुरेशी होईल. म्हणुन मी मुद्दा क्रमांक—४ चे उत्तर त्याप्रमाणे देत आहे. तसेच अनावेदकाने आजतागायत आवेदिकेच्या पालनपोषणासाठी औषधोपचारासाठी कसलीही व्यवस्था केलेली दिसुन येत नाही. त्यामुळे अनावेदकाने आवेदीकेला अर्ज दाखल तारखेपासुन पोटगी रक्कम द्यावी म्हणुन मी मुद्दा क्रमांक—५ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. अनावेदकाने आवेदिकेला दरमहा ३,०००/— रुपये (तिन हजार रुपये) पोटगी म्हणुन अर्जदाखल तारखेपासुन दयावी.

३. अनावेदकाने या अर्जाच्या खर्चापोटी आवेदिकेस २,०००/— रुपये (दोन हजार रुपये) दयावे.

४. या न्यायनिर्णयाची एक प्रत आवेदिकेस मोफत द्यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

स्वा/—
**(श्रीमती व्ही.डी.बिरहारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्रमांक—२) पुसद

दिनांक : २३.०३.२०२६